# 'पुलं'च्या साहित्याची गोडी आता 'ई-बुक'मध्ये

**श्रद्धा पेडणेकर : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ९ : पु. ल. देशपांडे यांची पुस्तके वाचली नाहीत, असा माणूस मराठी मुलखात सापडणे कठीण! सगळ्यांनाच 'पुलं'च्या पुस्तकांची भुरळ पडते. त्यांच्या चाहत्यांकडून केल्या जाणाऱ्या मागणीनुसार 'टेक्नोसॅव्ही' पिढीसाठी महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाचे साहित्य उद्या (ता. १०) 'ई-बुक'च्या स्वरूपात प्रकाशित होणार आहे.

कुसुमाग्रज, भालचंद्र नेमाडे, विश्वास पाटील यांचे साहित्य 'बुकगंगा डॉट कॉम' यांनी 'ई-बुक' स्वरूपात आणले आहे. 'पुलं'चे लेखन मराठी वाचकवर्गात 'ऑल टाईम फेव्हरेट' मानले जाते. मागील पिढ्यांप्रमाणे सध्याच्या पिढीवरही त्यांच्या साहित्याची मोहिनी कायम आहे. त्यांची ग्रंथसंपदा 'ई-बुक'च्या स्वरूपात यावी, अशी मागणी वाचकांकडून होत होती. ही मागणी पूर्ण करत असल्याचे 'बुकगंगा डॉट कॉम'च्या संजय पेठे यांनी सांगितले.

परचुरे प्रकाशन आणि हृदयेश आर्टस यांच्यातर्फे 'पुलं'च्या 'गाठोडं' या 'ई-बुक'चे प्रकाशन उद्या केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होईल. मौज प्रकाशनातर्फे 'व्यक्ती आणि वल्ली', 'बटाट्याची चाळ', 'हसवणूक' आणि 'मैत्र' ही पुस्तकेही पुढील आठवड्यात अशाच स्वरूपात वाचकांच्या भेटीला येतील.